नागपूर महसूल विभागातील ३ क्षेत्रिय अधिकाऱ्यांना जुन्या निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास मंजुरी देणेबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः वाहने-२०२०/प्र.क्र.११३/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १८ मार्च, २०२१.

संदर्भ:-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जेपीएस-२०१३/प्र.क्र.३१४/ई-८, दि. २१/०४/२०१६
२)शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-वाहन-२०१७/प्र.क्र.४१/१७/विनियम, दि.२८/०७/२०२०.
३)जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे पत्र क्र. कार्या-२/जि.ना.सं.क्र. कावि/११५६/२०२०, दि. २२/१२/२०२०.

प्रस्तावना:-

नागपूर महसूल विभागातील लेखाशिर्ष "२०५३- जिल्हा प्रशासन" या खाली वेतन आहरित करणाऱ्या ११६ क्षेत्रीय अधिकाऱ्यांना शासकीय वाहनांची अनुज्ञेयता संदर्भाधीन दि.२१/०४/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी त्यांच्या संदर्भाधिन दि.२२/११/२०२० च्या पत्रान्वये तहसीलदार चामोर्शी,कोरची व एटापल्ली यांचेकरिता निर्लेखित केलेल्या वाहनांच्या बदली नवीन वाहन खरेदीस मंजूरी देण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

नागपूर महसूली विभागातील या शासन निर्णयासोबतच्या सहपत्र -अ॰ मध्ये नमूद केलेल्या तहसीलदार चामोर्शी,कोरची व एटापल्ली या २ क्षेत्रिय अधिकाऱ्यांना त्यांच्या पूर्वीच्या जुन्या निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास व तदप्रित्यर्थ येणाऱ्या रु. ८.०० लाख याप्रमाणे एकूण रु.२४.०० लाख (रुपये चोवीस लाख फक्त) च्या खर्चास खालील अटींच्या अधिन राहून शासन मंजूरी देण्यात येत आहे.-

१. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-वाहन-२०१७/प्र.क्र.४१/१७/विनियम, दिनांक २८/०७/२०२० च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार, सहपत्र -अ॰ मधील तहसीलदार चामोर्शी, कोरची व एटापल्ली यांच्यासाठी प्रत्येकी रु.८.०० लाखाच्या कमाल मर्यादेत (वाहनाची किंमत + वस्तू व सेवा कर + टेम्पररी रजिस्ट्रेशन चार्जेस + मूल्यवर्धित कर + सहाय्यभूत साहित्य (Accessories) इत्यादी अंतर्भूत करुन) वाहन खरेदी करण्यात यावी.
२. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि. ०१/१२/२०१६ व क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र. २१५/उद्योग-४, दि. २४/०८/२०१७ च्या शासन निर्णयानुसार वाहन खरेदी GeM Portal वरुन विहित पध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावी.

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. वाहन-२०१३/प्र.क्र.४६/१३/विनियम, दि. ०३/१०/२०१७ मधील सूचनांनुसार, वाहन आढाव्या अन्वये नागपूर महसूल विभागाकरीता अनुज्ञेय ठरविण्यात आलेल्या सर्व ११६ वाहनांची माहिती महावाहन संगणक प्रणालीवर नोंदविण्यात यावी. त्याबाबतचा एकत्रित अनुपालन अहवाल वाहन नोंद प्रमाणपत्राच्या प्रतीसह विभागीय आयुक्त, नागपूर यांनी शासनास सादर करावा.

४. नवीन वाहन ज्या पदधारकास मंजूर करण्यात आले आहे, त्या पदधारकाने सदर वाहनाचा वापर संबंधित कार्यालयाच्या शासकीय कामकाजासाठीच करावा.

५. नविन वाहन खरेदीनंतर जुन्या वाहनांची नोंद महावाहन वरून नष्ट करून नविन वाहनांची नोंद त्या ठिकाणी करण्यात यावी.

६. वाहन चालकांच्या उपलब्धतेनंतर वाहन खरेदी करण्यात यावी.

२. सदर प्रस्तावातील खर्च लेखाशिर्ष "मागणी क्र. बी-१० ४०५५- पोलीसांवरील भांडवली खर्च न (००) २०७ राज्य पोलीस (००)(१२) नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यासाठी पायाभूत सेवा व सुविधा (४०५५०२७९) ह्या उपशिर्षाखाली केंद्र सरकारने उपलब्ध करून दिलेल्या निधीतून भागविण्यात यावा. ३. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक २०१/ २०१९/विनियम, दिनांक ४/०५/२०१९ व अनौपचारीक संदर्भ क्रमांक २०२१/सं.क्र.४५/व्यय-९, दि.२५ /०१/२०२१ अन्वये त्या विभागाने दिलेल्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०३१८१४४४२८०६१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

AJIT SOPANRAO DESHMUKH

Digitally signed by AJIT SOPANRAO DESHMUKH
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=3d2bd4ed83b4c722151f75f40dad09e69527159e04d26476bbf5363e7b1c3cb2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=704cb545c50221b15cde7ccb8854e694c765dfb3a0240e891ebfb56ee79e3440, ou=REVENUE, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=AJIT SOPANRAO DESHMUKH
Date: 2021.03.18 14:49:48 +05'30'

(अजित देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
२) जिल्हाधिकारी, गडचिरोली.
३) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा) -२, महाराष्ट्र, नागपूर .
४) जिल्हा कोषागार अधिकारी,गडचिरोली
५) सह सचिव/उप सचिव, वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/विनियम), मंत्रालय, मुंबई-३२.
६) निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

सहपत्र 'अ'

शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांकः वाहने-२०२०/प्र.क्र.११३/ई-८

दि.१८ मार्च,२०२१

सोबतचे विवरणपत्र

नागपूर महसूल विभागातील क्षेत्रिय स्तरावरील अधिकाऱ्यांच्या वापरातील निर्लेखित वाहनांचे विवरणपत्र

अ.क्र.	विभाग	वाहन वापरणा-या अधिका-यांचे पदनाम	निर्लेखित वाहनाचा क्रमांक
१.	नागपूर,गडचिरोली	तहसीलदार,चार्मोशी, जि.गडचिरोली	MH-३३-C-१२१
२.		तहसीलदार,कोरची जि.गडचिरोली,	MH-३३-C-१२४
३.		तहसीलदार, एटापल्ली जि.गडचिरोली	MH-३३-C-११६